# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

## सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या

## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी

## मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - १२

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडए-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०३, तंत्र शिक्षण**<br>**रूपये:- १३,०९,७९,६६,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ५६०१ | १० | कौशल्य विकास व रोजगार यांच्या प्रशिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या चार प्रमुख योजनांचा ५४ कोटी निधी शिल्लक रहात असल्याचे विभागाच्या परफॉर्मन्स बजेट अहवालातून माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाकडे नोकरीच्या शोधात असलेल्या ५६ लाख ४० हजार तरुणांनी नोंदणी केलेली असणे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून जास्तीत जास्त तरुणांना रोजगार, कौशल्य, उद्योजकता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (२) | ५६०३ | १० | महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी यांना दरमहा विद्यावेतन देण्यात येत असणे, आर्थिक वर्ष २०२८,२०१९,२०२०,२०२१,२०२२ या आर्थिक वर्षातील महाराष्ट्रातील प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन देण्यात आलेले नसणे, खुला व मागास प्रवर्ग तसेच महिला व दिव्यांग या लाभार्थ्यांना विद्यावेतन देण्यात आलेले नसणे, प्रशिक्षणार्थ्यांना वितरीत होत असलेले विद्यावेतन कमी असल्यामुळे विद्यावेतनात वाढ करण्याबाबत शासनाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (३) | ५६०४ | १० | रोहा (जि.रायगड) येथील शासकीय तंत्र विद्यालयात तंत्रशिक्षण देणारे पूर्णवेळ शिक्षक नसल्याने एकुण २४० विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, दोन्ही तंत्र विषयांसाठी तातडीने पूर्णवेळ शिक्षक नियुक्ती करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (४) | ५६०७ | १० | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हवेली जि. पुणे या संस्थेस स्वत:ची इमारत नसल्याने सद्या पेरणे फाटा येथे भाडयाच्या इमारतीमध्ये सुरू असणे, मा. संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट राज्य, मुंबई यांनी दिनांक 15/03/2022 रोजीच्या कार्यालयीन आदेशाने प्रस्तावित बांधकामावरील खर्च जिल्हा नियोजन समिती पुणे करणार असल्याचे सांगणे, सदर इमातीच्या बांधकामास निधी मिळून कामास सुरूवात करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५) | ५६०८ | १० | चंद्रपूर जिल्हयात १८ शासकीय आयटीआय असून, बहुतांश ठिकाणी नियमित प्राचार्य नसल्यामुळे त्याचा इतरांकडे कार्यभार सोपविण्यात आला असल्याचे आढळून आलेले असणे, शासनाने आयटीआय विद्यार्थ्यांसाठी हिवाळी अधिवेशनात विद्यावेतनात वाढ केलेली असली तरी निर्वाहभत्ता आणि प्रवेश शुल्क चार वर्षांपासून आदिवासी विद्यार्थ्यांना मिळाले नसल्याचे निदर्शनास आलेले असणे, आयटीआयच्या सर्व व्यवसायामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विकास विभागाने मंजूर केल्यानुसार प्रतिमाह निर्वाहभत्ता देण्याची तरतूद असणे, यासाठी आदिवासी विकास विभागाकडून अनुदानही दिले जात असणे, शासनाकडून अनुदान प्राप्त झाले असतांना प्रशिक्षणार्थ्यांना निर्वाह भत्त्याचे वाटप झाले नसल्याचेही प्रशिक्षणार्थ्यांकडून दि.२९ डिसेंबर,२०२३ रोजी वा त्यासुमारास सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले असणे, या प्रकरणी शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही. |
| (६) | ५६१० | १० | राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जागतिक बँकेच्या सहकार्यातून मॉडेल आयटीआय, मुलींसाठी मॉडेल आयटीआय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, उक्त प्रकरणी मॉडेल आयटीआय उभारण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना |
| (७) | ५६११ | १० | राज्यातील बेरोजगांराच्या कौशल्य विकासासाठी केंद्र सरकारची दिनदयाळ उपाध्याय ग्रामिण कौशल्य विकास योजना राबविण्यात येत असणे, या योजनेअंतर्गत सन 2017 ते 2019 या कालावधीत शासनाची फसवणूक केल्याच्या कारणास्तव संबंधीत योजना राबविणाऱ्या कंपन्यांविरुद्ध नवी मुंबई येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असणे, हीच शक्यता लक्षात घेवून योजनेअंतर्गत राज्यातील प्रशिक्षण कार्यक्रमाचे संचालन करणाऱ्या इतर संस्थांच्या कंपन्यांच्या कामाचे परिक्षण आणि मूल्यमापन करण्याची आवश्यकता, गैरप्रकार आढळून आलेल्या संस्थांविरुद्ध शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५६१४ | १० | राज्यातील शासकीय आयटीआयमध्ये अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना निर्वाहभत्ता व प्रवेश शुल्क देण्याची तरतूद असतांना प्रभारी प्राचार्यामुळे हजारो आदिवासी विद्यार्थ्यावर आर्थिक अन्याय करत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले असणे, चंद्रपूर जिल्ह्यात १८ शासकीय आयटीआय असून बहुतांश ठिकाणी नियमित प्राचार्य नसल्याने इतरांकडे कार्यभार सोपविल्याने अनेक जिल्हाधिकारी तसेच मा. मुख्यमंत्री यांना तक्रार करण्यात आलेली असणे, उक्त प्रकरणी चौकशी करून तद्अनुषंगाने शासनाकडून करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (९) | ५५१५ | १० | एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयास गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दि. २४ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री आणि मा.मंत्री कौशल्य विकास यांच्याकडे मागणी केलेली असणे, सुमारे २०० वर्षे जुन्या असलेल्या आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शाळेची अवस्था अतिशय दयनीय झालेली असणे, या संस्थेचा बहुतांश भाग इतर प्रशासकीय कार्यालयांसाठी वापरला जात असल्याने या शाळेमध्ये विद्यार्थी, वर्ग, कार्यशाळा आणि शिक्षकांची संख्या अत्यल्प झाल्याचे दिसून आलेली असणे, केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत शालेय शिक्षणामध्ये तांत्रिक, कौशल्य व व्यवसाय अभ्यासक्रम विषयांची जोड देऊन इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत प्राथमिक व्यवसाय अभ्यासक्रम (Introductory Vocational Course) व इ. ९ वी ते १२ वी अभ्यासक्रमांतर्गत एकात्मिक व्यावसायिक शिक्षणाची (Integrated Vocational Course) जोड देवून हे नवीन अभ्यासक्रम एल्फिन्स्टन तांत्रिक शाळेमध्ये सुरु करण्याची मागणी असणे, त्यामुळे इ. १२ वी नंतर उद्योग आस्थापनांना व व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या विद्यापीठांना या संस्थेमधून कुशल तांत्रिक, कौशल्य व व्यवसाय अभ्यासक्रमयुक्त विद्यार्थी पुरवठा होवून नवीन स्टार्ट अप सुरु करणारे नवउद्योजक निर्माण होवून स्वयंरोजगाराला अधिक चालना मिळणार असणे, एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूलचे तांत्रिक कौशल्य व व्यवसाय अभ्यासक्रमाचे सेंटर ऑफ एक्सलन्स व बळकटीकरण करण्यासाठी तसेच उच्च प्रतीचे तांत्रिक कौशल्य व व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यासाठी उद्योग आस्थापनांसोबत सार्वजनिक सहभाग योजने अंतर्गत सहकार्य घेवून आजच्या व भविष्यात बाजारात मागणी असणाऱ्या उत्तम व्यवसाय अभ्यासक्रमांचे कौशल्य व ज्ञान असणारे कुशल तांत्रिक मनुष्यबळाची निर्मिती करणे शक्य होणार असणे, या शाळेच्या इमारतीमधील इतर शासकीय कार्यालये अन्य ठिकाणी स्थलांतरित करण्याची आवश्यकता, आगामी शैक्षणिक वर्षापासून एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय व कनिष्ट महाविद्यालय, मुंबई येथे पूर्णवेळ विविध नवीन तांत्रिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करून या शाळेला गतवैभव मिळवून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ५५१७ | १० | नाशिक येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित असणे, या सेंटरमध्ये स्थानिक पातळीवर कौशल्याच्या ज्या गरजा आहेत त्यांचा विचार करून कोर्सेस आणि कार्यक्रम राबविणार असणे, सर्व अभ्यासक्रमांमध्ये ६० टक्के जॉब आणि ४० टक्के प्रशिक्षण असणे, यामध्ये उद्योगांचा सहभाग मोठ्या प्रमाणात अपेक्षित असणे, या उपकेंद्रामुळे नाशिक मधील युवक व विद्यार्थ्यांना रोजगारासाठी संधी प्राप्त होणार असणे, त्यामुळे सदर कौशल्य विद्यापीठाचे उपकेंद्र लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता असणे,  यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडए-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास**<br>**रूपये:- १७,९६,५९,३४,०००/-**<br>**अॅड. अशोक पवार** |
| (११) | ५५८१ | १० | औद्योगिक प्रशिक्षण संस्था हवेली या संस्थेस 7 व्यवसायांचे प्रशिक्षण सुरु असून 220 प्रशिक्षणार्थी शिकत असणे, सद्य:स्थितीत ही संस्था सोनाई मंगल कार्यालय पेरणे फाटा नगर रोड तालुका हवेली येथे भाडेच्या इमारतीत कार्यरत असणे, या इमारतीस 2 लाख रुपये महिना भाडे असणे, सदर जागा प्रशिक्षणाच्या दृष्टीने अपूरी जागेत अत्यंत गैरसोईचे असून विहीत मानकानुसार नसणे, सदर संस्थेसाठी वाघोली येथील जागा मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेशाने गट नंबर 1413,1415 व 1416 मधील 3 एकर जागा या संस्थेस उपलब्ध करुन दिली असणे, या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारत व कार्यशाळा बांधकामासाठी 16 कोटी 40 लाख रुपयांच्या प्रस्तावाला मंजूरी मिळणेकरिता कौशल्य विकास विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्रस्ताव प्रलंबित असणे, सदर प्रस्ताव मंजूर करणेकरिता शासनस्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे याबाबत शासनाची प्रतिक्रिया व उपाययोजना |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१२) | ५५३६ | १० | पंडीत दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास ही केंद्र सरकारची योजना राज्य सरकारच्या माध्यमातून राबविण्यात जात असणे, १८ ते ३५ वयोगटातील तरूण तरूणींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण या योजनेंतर्गत देण्यात येत असून त्यात अनुसुचित जाती ३१ टक्के, अनुसुचित जमाती २५ टक्के, अल्पसंख्याक २० टक्के, आणि महिलांचे ३३ टक्के असे उमेदवारांचे प्रमाण असणे, अशा या चांगल्या योजनेच्या प्रशिक्षनाचे काम राज्यातील कंपन्यांना देण्यात यावे असा केंद्र शासनाचा नियम असतांना सुध्दा अधिकाऱ्यांनी राज्याबाहेरील कंपन्यांना काम देण्यात येणे, प्रशिक्षण देण्याच्या मोबदल्यात सुर्या वायर प्रा.लि.या कंपनीस ७ कोटी २६ लाख रु, जाईजुई चॅरिटेबल ट्रस्ट ७९ लाख रु, ध्येयपुर्ती सेवा स्वयंरोजगार प्रशिक्षण सहकारी संस्थां ७९ लाख रु. आणि अॅपेरल अॅन्ड लेदर टेक्ननिक्स प्रा.लि. १ कोटी १० लाख रु या प्रमाणे या चारही कंपन्यास ९ कोटी १० लाख रुपये आगाऊ अदा करण्यात आले असणे, प्रशिक्षण देण्याच्या मोबदल्यात या चारही कंपन्यास ३७ कोटी ३५ लाख रुपये मोबदला म्हणून देण्याचे ठरविण्यात आले असून त्यापैकी ९ कोटी १० लाख रुपये आगाऊ रक्कम देण्यात येणे, मात्र करोडो रुपये देण्यात येऊन सुध्दा या चारही कंपन्याकडून कुणालाही प्रशिक्षण देण्यात आले नसल्याची माहिती माहे सप्टेंबर २०२२ च्या सुमारास निर्देशनास येणे, हे गंभीर प्रकरण ग्रामविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या लक्षात येताच त्यांनी याबाबत पोलीस विभागाला पत्र लिहून कार्यवाही करण्याचे कळविण्यात येणे, मात्र अद्यापही कार्यवाही झालेलीच नसणे, गरिब होतकरु बेरोजगार युवकांसाठी असलेल्या या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | योजनेचा कंपन्या व अधिकाऱ्यांच्या संगनमताने करोडो रुपयांचा गैरप्रकार होऊन सुध्दा या गंभीर प्रकरणी अद्यापही कार्यवाही होत नसल्याने नागरिकांत पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई